## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३

जा.क्र.:मका/कार्यक्रम/२०१६-२०१७/323 दिनांक :- ६/8/२०१६

# प रि प त्र क

विषय:- शिशु मंदिर / इंग्रजी बालवाडी-२०१६-१७

मंडळाच्या राज्यातील सर्व केंद्रामध्ये कामगारांच्या मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षणाची सोय व्हावी यासाठी शिशु मंदिर उपक्रमाच्या माध्यमातून लहान मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येते तसेच सन २०१२-१३ या अर्थिक वर्षापासून काही प्रमुख केंद्राच्या ठिकाणी इंग्रजी बालवाडी सुरु करण्यात आलेले आहेत.

शिशु मंदिर व इंग्रजी बालवाडी हा उपक्रम खालील प्रमाणे दर्शविलेल्या सुचनाप्रमाणे आयोजित करण्यात यावे.

१. सदर उपक्रमामध्ये २वर्ष ६महिने ते ५ वर्षे वयोगटातील मुलांमुलीकरीता प्रवेश देण्यात यावा.
२. शिशु मंदिर व इंग्रजी बालवाडीमध्ये प्रत्येक वर्गासाठी आवश्यक ४० मुलामुलींची नोंदणी दिनांक १५.६.२०१६ पर्यंत पूर्ण करावी.प्रवेश अर्जाची फोटोसह पुर्तता करणे बंधनकारक आहे, तसेच जन्म दाखला अर्जासोबत जोडण्यात यावा.
३. प्रवेश नोंदणी करतांना कामगार कुटुंबिय मुलांना प्रधान्य द्यावे एकूण प्रवेश नोंदणी संख्येच्या ५0% नोंदणी ही कामगार / कामगार कुटुंबिय मुलांची असणे आवश्यक आहे.ज्या केंद्रातील कर्मचारी शिशु मंदिरात कामगार कुटुंबिय मुलांची नोंदणी करणार नाहीत त्या केंद्रातील वर्ग बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
४. शिशु मंदिरामध्ये सकस आहार सुरु करण्याकरीता कमीत कमी ३० मुलामुलींची नोंदणी आवश्यक आहे.त्याशिवाय विभाग प्रमुखांनी मंजूरी प्रदान करु नये.
५. शिशु मंदिर वर्गाचे अभ्यासक्रमाबाबतचे परिपत्रक क्रमांक सीओ/पिएडी/२००३-०४/२०८६ दिनांक ०१.०९.२००३ व इंग्रजी बालवाडी वर्गाचे अभ्यासक्रमाचे परिपत्रक क्र.मका/कार्यक्रम/२०१२-१३/७१३ दिनांक ११.०७.२०१३ नुसार दिलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे मुलांना शिकविण्यात यावे.
६. दिनांक १६ जून २०१६ पासून सर्व शिशु मंदिर व इंग्रजी बालवाडी नेहमीच्या वेळेप्रमाणे सुरु करण्यात यावे. दिनांक १५ जून २०१६ पर्यंत शिशु मंदिर वर्ग /इंग्रजी बालवाडी करीता दिलेली प्रवेश नोंदणी संख्या पूर्ण करण्यास असमर्थ ठरतील अशा संबंधित महिला कर्मचा-यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.
७. **प्रवेश अर्जासोबत मुलांमुलींच्या पालकाचे बँकेच्या खात्याचा तपशील (बँकेचे नांव व शाखा, बचत खाते क्रमांक, आयएफएससी क्रमांक व मायकर क्रमांक इ.)जोडणे बंधनकारक आहे.शिशु मंदिर/इंग्रजी बालवाडीतील मुलांमुलींना मंडळाकडून आर्थिक लाभ द्यावयाचे झाल्यास रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल.**

(स्वाक्षरी)
कल्याण आयुक्त

प्रत,

१) सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, ठाणे/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/अकोला/कामगार क्रीडा भवन, मुंबई
२) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, औरंगाबाद,
३) कामगार विकास अधिकारी, नागपूर/पुणे
४) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये
५) कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये). ★★★
६) सर्व केंद्र प्रमुख, सर्व केंद्रे

★★★ यांनी सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.